नागरी/ग्रामीण क्षेत्रातील सहकारी ग्राहक संस्थांना अर्थसहाय्य करण्याबाबत.
(हुतात्मा मध्यवर्ती सहकारी ग्राहक भांडार मर्या.वाळवा जि. सांगली)

महाराष्ट्र शासन
सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग,
शासन निर्णय, क्रमांक: सपस-२०१८/प्र.क्र.३७६/२४ स
मंत्रालय, विस्तार, मुंबई-३२
दिनांक:- ८ मार्च,२०१९

संदर्भ :- (१) शासन निर्णय, सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग,क्रमांक ग्राहक १०९२/ बजेट/ प्र.क्र.२३२/२४-स, दिनांक ३० मे, १९९४ व दिनांक १४ मार्च, १९९५.
(२) शासन निर्णय, सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, क्रमांक सपस-१००७/प्र.क्र.१०८/ २४-स, दिनांक २६ डिसेंबर, २००७.

प्रस्तावना :-

राज्यातील नागरी/ग्रामीण क्षेत्रातील ग्राहकांना जीवनोपयोगी वस्तू रास्त भावात मिळण्यासाठी त्याचप्रमाणे उत्पादकांना त्यांनी उत्पादित केलेल्या ग्राहकोपयोगी उत्पादनांना योग्य भाव मिळण्यासाठी व ग्राहक संस्थांमुळे बेरोजगारांना रोजगार उपलब्ध होणे इ. महत्वाच्या बाबींचा विचार करुन राज्यातील ग्रामीण व नागरी क्षेत्रातील सहकारी ग्राहक संस्थांना अर्थसहाय्य करण्याची योजना दिनांक ३०/०५/१९९४ व दिनांक १४/०३/१९९५ च्या शासन निर्णयानुसार सन १९९४-१९९५ पासून राबविण्यात येत आहे. सदर योजनेचे स्वरुप, अर्थसहाय्याचे सूत्र (पॅटर्न), अर्थसहाय्य मंजूर करण्यासाठीचे निकष, अटी, शर्ती इ. बाबतची माहिती योजनेच्या शासन निर्णयामध्ये नमूद करण्यात आलेली आहे.

शासन निर्णय:-

नागरी/ग्रामीण क्षेत्रातील सहकारी ग्राहक संस्थांना अर्थसहाय्य ही योजना शासन निर्णय, दिनांक २६/१२/२००७ अन्वये सहकारी आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्याकडे हस्तांतरित करण्यात आली आहे. पणन संचालक, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी सदर योजनेतंर्गत अर्थसहाय्य मंजूरीसाठी सादर केलेल्या हुतात्मा मध्यवर्ती सहकारी ग्राहक भांडार मर्या. वाळवा जि. सांगली या संस्थेच्या प्रस्तावास मान्यता देण्यात येत आहे. यासाठीचे आदेश पणन संचालनालय स्तरावरुन निर्गमित करण्यात यावेत.

२. सन २०१८-२०१९ या वित्तीय वर्षात या योजनेंतर्गत होणारे खर्च खाली नमूद केलेल्या लेखाशिर्षाखालील उपलब्ध तरतूदीतून खर्ची टाकण्यात यावेत:-

अ.क्र.	लेखाशीर्ष
१	मागणी क्रमांक व्ही-२, ३४५६, नागरी पुरवठा, १९५, सहकारी संस्थांना सहाय्य, (०२) सहकारी संस्थांना सहाय्य, (०२)(०८)ग्रामीण सहकारी संस्थांना अर्थसहाय्य (३४५६ ०११२) ३३ अर्थसहाय्य

२	मागणी क्रमांक व्ही-२, ३४५६, नागरी पुरवठा, (१९६), जिल्हा परिषदांना सहाय्य,पंचवार्षिक योजनांतर्गत योजना (००) (००) (०१) नागरी ग्राहक सहकारी संस्थांना अर्थसहाय्य (३४५६ ०१२१) (कार्यक्रमांतर्गत) ३३ अर्थसहाय्य
३	मागणी क्रमांक व्ही-३, ५४७५ इतर सर्वसाधारण आर्थिक सेवावरील भांडवली खर्च, ०० १०२ नागरी पुरवठा (०१) ग्राहक सहकारी संस्था (०१)(०६) ग्रामीण ग्राहक सहकारी संस्थांना भागभांडवली अंशदान (५४७५०१३२) (कार्यक्रमांतर्गत) ३२ अंशदाने,
४	मागणी क्रमांक व्ही-३, ५४७५,इतर सर्वसाधारण आर्थिक सेवावरील भांडवली खर्च, ०० १०२ नागरी पुरवठा (०१) ग्राहक सहकारी संस्था (०१)(०७) नागरी ग्राहक सहकारी संस्थांना भागभांडवली अंशदान (५४७५०१४१) (कार्यक्रमांतर्गत) ३२ अंशदाने
५	मागणी क्रमांक व्ही-५, ७४७५,इतर सर्वसाधारण आर्थिक सेवासाठी कर्जे, (००) (१०३) नागरी पुरवठा, (००)(०६)ग्रामीण ग्राहक सहकारी संस्थांना कर्जे (५४७५०१२५) (कार्यक्रमांतर्गत) ५५ कर्जे व आगाऊ रकमा,
६	मागणी क्रमांक व्ही-५, ७४७५,इतर सर्वसाधारण आर्थिक सेवासाठी कर्जे, (००) (१०३) नागरी पुरवठा, (००)(०७) नागरी ग्राहक सहकारी संस्थांना कर्जे (५४७५०१३४) (कार्यक्रमांतर्गत) ५५ कर्जे व आगाऊ रकमा,

या योजनेंतर्गत उपलब्ध तरतूदीचे आहरण करुन ती संबंधित संस्थेस वितरीत करण्याच्या प्रयोजनार्थ लेखाधिकारी, पणन संचालक कार्यालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना आहरण व संवितरण अधिकारी व पणन संचालक, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना नियंत्रक अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे

२.   सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक संकेताक २०१९०३०८१३०३३७७६०२ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावांने,

Ghadyale Sunanda Mohanrao

Digitally signed by Ghadyale Sunanda Mohanrao
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Co-operation, Marketing and Textiles, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=fd89208cbc27b202c96467165ac5bc9643515d80ba9ed ecaf650dad6e8311b45, cn=Ghadyale Sunanda Mohanrao
Date: 2019.03.08 13:06:10 +05'30'

(सुनंदा मो. घड्याळे)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१) मा. मंत्री (सहकार, पणन व वस्त्रोद्योग) मंत्रालय, मुंबई
२) मा. राज्यमंत्री (पणन) यांचे मंत्रालय, मुंबई
३) अ.मु.स. (वित्त) वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई
४) अ.मु.स(नियोजन) मंत्रालय,मुबई
५) प्रधान सचिव(पणन) सहकार पणन व वस्त्रोद्योग विभाग,मंत्रालय,मुंबई
६) पणन संचालक, महाराष्ट्र राज्य, पुणे,
७) कृषि आयुक्त,महाराष्ट्र राज्य,पुणे
८) सहकार आयुक्त व निबंधक सहकारी संस्था,पुणे
९) सर्व विभागीय सहनिबंधक,सहकारी संस्था
१०) कार्यकारी संचालक,महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळ, पुणे
११) कार्यकारी संचालक,महाराष्ट्र राज्य सहकारी ग्राहक पणन महासंघ,मुंबई
१२) सर्व जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था
१३) महालेखापाल, महाराष्ट्र-१ /२ (लेखा व अनुज्ञेयता / लेखापरिक्षा), मुंबई/नागपूर,
१४) अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
१५) लेखा कोषागार अधिकारी,पुणे
१६) अवर सचिव, १७ स, सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, मंत्रालय, मुंबई,
१७) निवड नस्ती २४ स, सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, मंत्रालय, मुंबई